MHRT010003292025

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दाखल तारीख | – | २४/०४/२०२५ | | |
| फैल तारीख | – | २८/०४/२०२५ | | |
| निकाल तारीख | – | २४/०३/२०२६ | | |
| कालावधी | – | वर्ष | महिने | दिवस |
| | | ०० | १० | २६ |

**प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी यांचे न्यायालयात**

**{ प्रमुख जिल्हा न्यायाधीश व्ही.वाय.जाधव }**

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२२/२०२५.**

**निशाणी क्रमांक ११**

**गणेश बाळकृष्ण बाणे** अर्जदार
उ.व.सु.४१ वर्षे, व्यवसाय– मजूरी,
रा.होळी, जैतापूर, ता.राजापूर , जि.रत्नागिरी.

**विरुध्द**

**सौ.श्रेया गणेश बाणे,** सामनेवाले
उ.व.सु.३५, व्यवसाय –गृहिणी,
रा.गोवळशी, ता.लांजा, जि.रत्नागिरी.

अर्जदारतर्फे विधिज्ञ डी.एस.पाटील.
सामनेवालातर्फे विधिज्ञ एल.जी.जेधे.

**न्या य नि र्ण य**

(जाहीर दिनांक २४ मार्च २०२६)

**१.** प्रस्तुतचा अर्ज मुदत कायदा १९६३ चे कलम ५ अन्वये दाखल करण्यात आला आहे. प्रस्तुत अर्ज दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, रत्नागिरी यांचे न्यायालयातील विवाह अर्ज क्र.२१६/२०२१ या अर्जातील नि.१७ च्या अंतरीम अर्जावर दि.१३/०१/२०२५

रोजी झालेल्या आदेशाविरुध्द सदरचे अपील दाखल करण्यास झालेला ५२ दिवसांचा विलंब माफ करण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्जदार यांनी अर्जात असे कथन केले आहे की, सदरचा अर्ज दिवाणी न्यायालय, व.स्तर, रत्नागिरी येथील विवाह अर्ज क्र.२१०/२०२१ या अर्जामध्ये दि.१३/०१/२०२५ रोजी नि.क्र.१७ च्या आदेशाविरुध्द सदरचे अपील दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यासाठी दाखल केला आहे. सदरच्या काळात अर्जदारला टायफॉईड झाला होता त्यामूळे तो न्यायालयात हजर राहू शकला नाही. त्याबाबतचे वैदयकीय प्रमाणपत्र याकामी दाखल केलेले आहे. या न्याय्य व संयुक्तीक कारणास्तव अर्जदार यास प्रस्तुत अपिल दाखल करण्यास ५२ दिवसांचा विलंब झाला आहे. विलंब माफ न झाल्यास अर्जदाराचे कधीही भरुन न येणारे असे नुकसान होणार आहे. तरी अर्जदाराने झालेला विलंब माफ करण्याची विनंती केली आहे.

३. सामनेवाला यांनी नि.९ अन्वये म्हणणे दाखल करुन सदर विलंब माफी अर्जास हरकत घेतली आहे. सामनेवाला यांनी म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, अर्जातील आजारी कारण खोडसाळ असून अर्जदार व सामनेवालीचे दरम्याने लांजा न्यायालयात घरगुती हिंसाचार अर्ज क्र.७५/२०१५ प्रलंबित आहे. सदर कामी अर्जदार माहे जानेवारी व फेब्रूवारी २०२५ मधील तारखांना उपस्थीत होता. त्याकाळात आजारपणाचे कारण सांगितले नव्हते. अर्जदारला विलंब माफीचा अर्ज मंजूर करणेचा झालेस जास्तीत जास्त दंड करण्याची विनंती केली.

४. अर्जदारतर्फे विधिज्ञ डी.एस.पाटील आणि सामनेवालातर्फे विधिज्ञ एल.जी.जेधे यांचा युक्तीवाद ऐकला.

५. अर्जदारातर्फे विधिज्ञ यांनी आपल्या युक्तीवादात असे कथन केले की, सदरच्या काळात अर्जदारला टायफाईड झाला होता त्यामूळे तो न्यायालयात हजर राहू शकला नाही. त्याबाबतचे वैदयकीय प्रमाणपत्र याकामी दाखल केलेले आहे. या न्याय्य व संयुक्तीक कारणास्तव अर्जदार यास प्रस्तुत अपिल दाखल करण्यास ५२ दिवसांचा विलंब झाला आहे.

६. सामनेवाला तर्फे विधिज्ञांनी सदर कारणे योग्य नाहीत आणि त्यांचे पुष्ठयर्थ कोणताही पुरावा नाही असे प्रतिपादन करुन त्यास विरोध दर्शविला. तसेच अर्जदारावर जास्तीत जास्त खर्च बसविण्याची विनंती केली आहे.

७. अर्ज, दाखल कागदपत्रे आणि पक्षकारांतर्फे करण्यात आलेल्या युक्तीवादावरुन माझ्या विचारार्थ आलेले मुद्दे व त्या मुद्दयावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे दिलेले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | हिंदु विवाह कायदा अर्ज क्र.२१६/२०२१ मधील दि.१३/०१/२०२५ रोजी नि.क्र.१७ विरुध्द अपिल दाखल करण्यासाठी झालेला ५२ दिवसांचा विलंब माफ केला जाऊ शकतो की नाही ? | होय. |
| २) | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ –**

८. अर्जाप्रमाणे नि.१७ च्या अंतरीम अर्जावरील आदेश दि.१३/०१/२०२५ रोजी पारीत करणेत आलेला आहे. अर्जदाराला टायफॉईड झाल्यामुळे अर्जदार मुदतीमध्ये अपिल दाखल करु शकला नाही. तसेच त्यांनी सदरच्या अर्जासोबत वैदयकीय प्रमाणपत्र दाखल केले आहे. अेनेक्चर 'A' वर लावलेल्या सदर वैदयकीय प्रमाणपत्रानुसार अर्जदार दि.२७/०१/२०२५ रोजी टायफॉईडने ग्रस्त होते व त्यास दोन ते अडीच महिने आराम करण्याचा सल्ला देण्यात आला् होता. त्यावरुन अर्जदार हा आव्हानित आदेश पारीत झाल्यानंतर दोन आठवडयात आजारी पडल्याचे दिसून येते. तसेच त्यास दिलेला दोन ते अडीच महिन्याचा विश्रांतीचा सल्ला पाहता विलंबासाठी नमूद केलेले कारण संयुक्तीक असल्याचे दिसून येते.

९. सामनेवालाच्या वकिलांनी आक्षेप नोंदवून सदरचा अर्ज मंजूर करणेचा झालेस जास्तीत जास्त दंड करण्यात यावा अशी विनंती केली.

१०. याच वेळी येथे हे ही नमुद करणे गरजेचे आहे की, जिल्हा न्यायालयात अपिल दाखल करण्याची मुदत ३० दिवसांची आहे. त्यामुळे वर नमुद ५२ दिवसांचा विलंब हा फार मोठा आहे असे म्हणता येणार नाही. प्रस्तावित अपिल दाखल करण्याची अर्जदाराची संधी केवळ विलंबाच्या तांत्रिक मुद्दयावर नाकारणे योग्य होणार नाही. सदरचे अपिल किंवा प्रकरण गुणवत्तेवर ऐकुन निकाली करणे आवश्यक आहे. माझ्या मते विलंब माफीमुळे सामनेवाला यांना झालेली गैरसोय ही त्यांना योग्य तो खर्च देवुन सदरचा विलंब अर्ज मंजुर करणे आवश्यक आहे. सदरचा विलंब अर्ज मंजुर करुन दोन्ही पक्षकारांना त्यांचे प्रकरण गुणवत्तेवर चालविण्यास एक संधी देण्यात येत आहे. सदरचा विलंबाचा कालावधी विचारात घेता रक्कम रुपये १,०००/-(अक्षरी रुपये एक हजार मात्र) नुकसानीपोटी देणे बरोबर राहील.

११. सदर प्रकरणाचा रोजनामा पाहता केवळ ५२ दिवसांच्या विलंब माफीसाठी जवळपास एक वर्षाचा कालावधी खर्ची पडला आहे. त्यामुळे अपिल नोंदविले गेल्यानंतर पुन्हा पक्षकारांना नोटीस बजावणी करीता आणखी वेळेचा अपव्यय करणे योग्य होणार नाही असे वाटते. त्यामुळे अपिल नोंदणी झाल्यानंतर पक्षकारांनी दि.२३/०४/२०२६ रोजी अपिलाच्या प्राथमिक सुनावणीकरीता न्यायालयात हजर रहावे. त्यासाठी वेगळया नोटीसा काढण्यात येणार नाहीत याची दोन्ही पक्षकारांना समज दिली. सबब खालील आदेश.

## <u>आदेश</u>

१. प्रस्तुतचा अर्ज खालील अटीवर मंजुर करण्यात येतो.

२. हिंदू विवाह अर्ज क्र.२१६/२०२१ मधील नि.१७ च्या अर्जावरील दिनांक १३/०१/२०२५ रोजी पारीत करण्यात आलेल्या व आदेशाविरुध्द अपिल दाखल करण्यास झालेला ५२ दिवसांचा विलंब रक्कम रुपये १,०००/-(अक्षरी रक्कम रुपये एक हजार मात्र) च्या खर्चासह मंजुर करण्यात येतो. सदरच्या खर्चाची रक्कम अर्जदारानी दोन आठवडयात न्यायालयात जमा करावी.

३. खर्चाची रक्कम भरल्यानंतर अपिल तपासणीस अधिन राहुन ते अपिल नोंदविण्यात यावे.

४. पक्षकारांनी अपिलाच्या प्राथमिक सुनावणीसाठी दि.२३/०४/२०२६ रोजी न्यायालयात हजर रहावे. त्याकरीता वेगळया नोटीसा काढण्यात येणार नाहीत याची नोंद घ्यावी.

(खुल्या न्यायालयात आदेश देवुन जाहीर केला.)

VINOD YASHWANTRAO JADHAV

Digitally signed by VINOD YASHWANTRAO JADHAV
Date: 2026.04.02 19:05:21 +0530

दिनांकः-२४/०३/२०२६

**(व्ही.वाय.जाधव)**
**प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी.**

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Civil Misc.Appln- No. | :- | 22/2025. |
| Name of Stenographer | :- | A.B.Patil. |
| Court Name | :- | Sessions Court, Ratnagiri. |
| Date of Decision | :- | 24/03/2026 |
| Order signed by P.O. on | :- | 24/03/2026 |
| Judgment uploaded on | :- | 02/04/2026 |